अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई–३०
दुरध्वनी क्र.– ०२२–२४९२१२१२, २४९२२६१८
Email - addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
दिनांक :– २१/०२/२०२५

## –: प्रेसनोट :–

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | ०९/२०२५ |
| कलम | कलम ७, १२ भ.प्र.अधिनियम १९८८. |
| आरोपी लोकसेवक | १) पुलकेश वसंत कदम, सहाय्यक आयुक्त, मस्त्यव्यवसाय विभाग, नविन प्रशासकीय इमारत, बांद्रा पुर्व, मुंबई<br>२) निरज अशोक चासकर, सहायक मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी, मस्त्यव्यवसाय विभाग, नविन प्रशासकीय इमारत, बांद्रा पुर्व, मुंबई<br>३) संजय धनाजी कोळी, (खाजगी इसम) |
| लाचेची मागणी | रू. १५,०००/- |
| स्विकारलेली रक्कम | रु. १५,०००/- |
| थोडक्यात माहिती | तक्रारदार यांची स्वत:ची मासेमारीची फायबर बोट असून मासेमारीकरीता मुंबई शहराचा बंदर परवाना आहे. तक्रारदार यांनी पुर्वीचा मासेमारी बंदराचा मुंबई परवाना रद्द करून सदर बंदर परवाना अलिबाग येथे ट्रान्सफर करण्याकरीता दिनांक ०९/१०/२०२३ रोजी सहाय्यक आयुक्त, मस्त्यव्यवसाय, प्रशासकीय इमारत, बांद्रा पुर्व, मुंबई कार्यालयात अर्ज केला होता. जानेवारी २०२५ पर्यंत संबंधीत कागदपत्रांची तक्रारदार यांनी पुर्तता करूनही सदरहू काम अद्याप पर्यंत प्रलंबीत आहे. दिनांक १९/०२/२०२५ रोजी नमूद कार्यालयातील खाजगी इसम श्री. संजय धनाजी कोळी यांनी तक्रारदार यांचे मोबाईलवर संपर्क करून उदया येवून मस्त्य विभागाचे अधिकारी पुलकेश कदम साहेब व निरज चासकर साहेबर यांना रू. १५,०००/- दया, त्यानंतर तुमचे काम होईल असे सांगितले. तक्रारदार यांना नमूद लोकसेवक व खाजगी इसम यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक २०/०२/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग येथे समक्ष येवून तक्रार दिली.<br>नमूद तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २०/०२/२०२५ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान खाजगी इसम संजय कोळी यांनी तक्रारदार यांना त्यांचे प्रलंबीत कामाकरीता रू. १५,०००/- लाचेची मागणी करून त्यापैकी लोकसेवक पुलकेश कदम यांना रू. ५,०००/- लाच व लोकसेवक श्री. निरज चासकर यांना रू. १०,०००/- लाच देण्याबाबत प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाले. त्याप्रमाणे तात्काळ करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार यांच्याकडून लोकसेवक पुलकेश कदम यांना रू. ५,०००/- व लोकसेवक निरज चासकर यांना रू. १०,०००/- लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले व खाजगी इसम संजय धनाजी कोळी यांना ताब्यात घेण्यात आले. म्हणून उपरोक्त नमूद लोकसेवक व खाजगी इसम यांच्याविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ कलम ७, १२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

तपास अधिकारी :- श्रीमती शैलजा शिंदे, पोलीस निरीक्षक पर्यवेक्षक अधिकारी :- श्री. गणपत परचाके, पोलीस निरीक्षक
मार्गदर्शन अधिकारी :- श्री. संदीप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. अनिल तुकाराम घेरडीकर, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. गजेंद्र गणपत मांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

( मनिषा झेंडे )
सहाय्यक पोलीस आयुक्त, (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास किंवा लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क माधावा.

**संपर्क :– लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.**
**टोलफ्री क्र.** १०६४, दुरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८
**वेबसाईट:–** acbmaharashtra.gov.in, **ईमेल:–** acbwebmail@mahapolice.gov.in
**मोबाईल ॲप:–** www.acbmaharashtra.net
**ईमेल:–** addlcpacbmumbai@mahapolice.gov.in **फेसबुक :–** www.facebook.com - Maharashtra ACB